# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, ३ रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक २२ ऑगस्ट २०१४.

**-: <u>सर्वसाधारण सभेची पुरवणी नोटीस</u> :-**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या **<u>मंगळवार, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता भरणा-या ऑगस्ट महिन्याच्या तिस-या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील जादा विषय क्र. ७ व ८</u>** विचारात घेण्यासाठी प्रसृत करण्यात येत आहे. :-

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव(प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

---

**०७. श्री. भरत सहादू नखाते, यांजकडून आलेली दिनांक २२/०८/२०१४ ची ठरावाची सूचना :-**

"नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सिडकोमार्फत प्राप्त भुखंडावर विकासकांनी महानगरपालिकेची रितसर बांधकाम परवानगी (C.C.) घेवून भुखंडावर इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर भुखंड सी.आर.झेड अंतर्गत येत असल्यामुळे सी.आर.झेडच्या नियमानुसार किंवा धोरणामुळे अशा भुखंडावरील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) मिळत नाही असे समजते. परंतु सदर इमारतीतील संबंधित लोकांनी महानगरपालिकेची बांधकाम परवानगी पाहूनच रितसर घरांची नोंदणी करुन विकत घेतलेले असून सदर इमारतीमध्ये लोक सुध्दा राहण्यास गेले आहेत. अशा इमारतींची सहकारी गृहनिर्माण संस्था सुध्दा सिडकोकडून अधिकृतरित्या नोंदणी करण्यात आलेल्या आहेत. परंतु महापालिकेमार्फत अशा भुखंडावरील इमारतींना दोषी ठरवून मालमत्ता कर तीन पट (दंडात्मक ) दंड वसुल करणेबाबत कळविले आहे. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था अथवा लोकांच्या कोणत्याही प्रकारची दोष नसल्याने दंड का भरावा. तरी याबाबत महापालिकेने सहानभुतीपूर्वक विचार करुन मालमत्ता कर तीन पट (दंडात्मक) दंड वसुल करण्यात येऊ नये व इतर सर्व साधारण इमारतीप्रमाणेच मालमत्ता कर आकारणे.

**०८. श्री. अनंत लक्ष्मण सुतार, यांजकडून आलेली दिनांक २२/०८/२०१४ ची ठरावाची सूचना :-**

"मा. आयुक्त यांचेकडून प्रशासकीय कमिटीच्या शिफारशीसह पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत त्वरीत सन्मा. महापौर सो. यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय कमिटीची याबाबतची बैठक आयोजित करण्यात येईल. तथापि देय असलेला सर्व कंत्राटी कर्मचारी, ठोक मानधनावरील व इतर कर्मचा-यांना वेतनातील फरक वितरीत करणे.